

# ग्लोबल महातेज

३ पान

४ पान

१ रु. स्वागत मूल्य

https://epaper.globalmahatej.com/

अमळनेर | वर्ष १ ले | अंक : ३

बुधवार, दि. २४ सप्टेंबर २०२५ | पाने : ४ | किंमत : १ रु. | Email - globalmahatej@gmail.com




## दिनविशेष

२४ सप्टेंबर

- या दिवशी पुणे करारावर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. जे भारतीय राजकारणातील एक महत्त्वाचे पाऊल होते. हा करार ब्रिटिश सरकारने अस्पृश्य समुदायासाठी स्वतंत्र मतदारसंघांची तरतूद केलेल्या सामुदायिक अधिष्ठानाला दुरुस्त करण्यासाठी करण्यात आला होता.
- होंडा मोटार कंपनीची स्थापना
- शिवाजी सावंत यांना त्यांच्या मृत्युंजय या प्रसिद्ध कादंबरीसाठी भारतीय ज्ञानपीठ संस्थेच्या मूर्तीदेवी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. हा पुरस्कार मिळवणारे ते पहिलेच मराठी लेखक आहेत.
- अमेरिकेतील लिटिल रॉक, अर्कान्सास येथे वंशभेदरहित शिक्षणासाठी फेडरल सैन्याला तैनात करण्यात आले होते. त्यामुळे कृष्णवर्णीय विद्यार्थ्यांना स्थानिक उच्च माध्यमिक शाळेत प्रवेश मिळविणे सोपे झाले होते.

## गर्व से कहो स्वदेशी है हम...! स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!

*स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!!*

*जय भारत...!*

*जय स्वदेशी...!!*

## परतीच्या पावसाने पिकांचे नुकसान

अमळनेर : महाराष्ट्रासह तालुक्यातील अनेक ठिकाणी परतीचा पाऊस जोरदार बरसला. त्यामुळे खरिपाची अनेक पिके उद्ध्वस्त झाली आहेत.



अमळनेर : आगामी पालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर आमदार अनिलदादा पाटील यांनी इच्छुकांची बैठक घेतली त्यात अनेकांनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. याप्रसंगी उपस्थित आमदार पाटील व विविध पदाधिकारी आणि कार्यकर्ते.

# महायुतीसोबतच अमळनेरवर प्रेम करणाऱ्यांना सोबत घेऊन पालिका निवडणूक लढवू : आमदार पाटील

## इच्छुकांना दिले स्पष्ट इशारे

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

**अमळनेर : आगामी पालिका निवडणुकीत महायुतीसोबतच अमळनेरवर प्रेम करणाऱ्या लोकांना आपण जोडणार आहोत. येणारी निवडणूक कोणत्याही परिस्थितीत आपण सर्व मिळून जिंकणार आहोत. या निवडणुकीत उमेदवारी करण्यासाठी जे इच्छुक असतील त्यांनी आपली उमेदवारी मात्र उत्स्फूर्तपणे लोकांच्या मुखातून येऊ द्यावी, अशी अपेक्षा व थेट सूचक इशारा माजी मंत्री तथा आमदार अनिलदादा पाटील यांनी आगामी पालिका निवडणुकीसाठी इच्छुक असलेल्यांच्या व कार्यकर्त्यांच्या बैठकीत दिला.**

आगामी पालिकेची निवडणूक महायुतीतर्फे लढवावी की महायुती प्रणीत आघाडीच्या माध्यमातून लढवावी? याबाबत इच्छुक उमेदवार व इतर कार्यकर्त्यांची मते जाणून घेण्यासाठी बैठकीचे आयोजन आमदार पाटील यांच्या निवासस्थानी करण्यात आले होते. सदर बैठकीत विविध पक्ष, गट - तट व माजी आमदारांच्या काही प्रमुख कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये (अजितदादा गट) प्रवेश केला. आमदार पाटील यांनी त्यांचे पक्षात स्वागत केले. उपस्थित जवळपास सर्वच जणांनी शहर विकास आघाडीच्या माध्यमातून निवडणूक लढवावी, असा आग्रह धरला. आपल्याकडे आमदार अनिलदादा पाटील यांच्या रूपाने सक्षम नेतृत्व असल्याने पालिकेवर आपलाच झेंडा फडकेल, असा विश्वास सर्वांनीच व्यक्त केला.

यावेळी आमदार पाटील म्हणाले, की ही बैठक ही केवळ चाचपणी आहे. यानंतर भाजप, राष्ट्रवादी काँग्रेस किंवा शिवसेना (शिंदे गट) या पक्षांच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांसोबत स्वतंत्र बैठक घेईल. त्यानंतरच योग्य तो निर्णय घेतला जाईल. त्यात अमळनेरवर प्रेम करणाऱ्या क्रियाशील कार्यकर्त्यांनाही सोबत घ्यावे, ही आमची सर्वांची भूमिका असेल. इच्छुक उमेदवारांनी आतापासूनच कामाला लागावे. खासदार स्मितातार्इ वाघ व माजी आमदार साहेबरावदादा पाटील आणि विविध क्षेत्रांतील सर्व प्रमुख लोकांशीही मी चर्चा करणार आहे. आपण ताकदीने लढू हे नक्की आहे.आता बऱ्याच अफवा उठतील, त्यांच्याकडे लक्ष देऊ नका. आपल्याकडे पालिका निवडणुकीसाठी अनेक सक्षम इच्छुक उमेदवार आहेत. अर्थात उमेदवाराची स्वतःची ताकद असलीच पाहिजे. तसेच उमेदवाराची दुहेरी भूमिका नकोच आहे. उमेदवारी निश्चित करताना अशा लोकांचा विचार होणार नाही. उमेदवाराने आपल्याला प्रभागाचा अभ्यास आहे का?

पान ४ वर

## अनेकांनी केला राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश

### या मान्यवरांचा झाला प्रवेश

यावेळी माजी आमदारांच्या गटाचे माजी नगरसेवक सलीम शेख (टोपी), फिरोज मिस्तरी, अॅड. सुरेश सोनवणे, नावेद शेख, नितेश लोहेरे, इम्रान हाजी कादर शेख, मुकेश शिवदास बिऱ्हाडे यांच्यासोबत अनेक कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. सदर प्रवेशामुळे माजी आमदारांच्या गटाला ऐन निवडणुकीच्या तोंडावर मोठा धक्का बसला आहे. त्यामुळे आमदार अनिलदादा पाटील यांची राजकीय ताकद वाढली आहे.

बैठकीत माजी नगराध्यक्ष विनोद पाटील, माजी उपनगराध्यक्ष मोहन सातपुते, विनोद लंबोळे, माजी नगरसेवक नरेंद्र संदानशिव, गोपी कासार, संजय कौतिक पाटील, संजय मराठे, हरीश वाधवानी, भाईदास महाजन, रामकृष्ण पाटील, विवेक पाटील, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष मुक्तार खाटीक,बिल्डर व डेव्हलपर हेमंत पवार, बाजार समितीचे माजी संचालक पराग पाटील, गोविंदा बाविस्कर, मेजर यादव, अरुण कदम, बाजार समितीचे संचालक सचिन बाळू पाटील, संतोष पाटील, दीपक पवार, देवेंद्र कांबळे, पप्पू कलोसे, कैलास नामदेव पाटील, अर्बन बँकेचे चेअरमन भरत ललवाणी, भास्कर पारधी, संजय पारधी, हिम्मत पारधी, गोकुळ पाटील, विजय वानखेडे, अमर पाटील, फयाज पठाण, संतोष लोहार, मुजफ्फर भंगारवाले, आबिद शेख, तुषार संदानशिव, जितू मराठे, विक्की पानसे, महेश सातपुते, दीपक पाटील,संजू पाटील, विवेक पाटील, अॅड. यज्ञेश्वर पाटील, पंकज साळी, जे. पी. पाटील, महेंद्र पाटील, सूरज परदेशी, अमित जैन, पिंटू चौधरी, संजय भिला पाटील, विजय कहारू पाटील, नितीन निळे, विजय सुकडू पाटील, संजय भिल, आरिफ पठाण, गुलाब अवचित पाटील, इम्रान खाटीक, प्रवीण बारकू महाजन, शेखा मिस्तरी, संजय हिम्मत महाजन, बाळू पाटील, तुळशीराम हटकर, दिलीप ठेकेदार, कैलास पाटील, भावेश जैन, भाजपचे माजी शहराध्यक्ष उमेश वाल्हे, राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष भूषण भदाणे, शरद पाटील, गौरव महाजन, शांताराम महाजन, राजू प्रकाश महाजन, बापू झुलाल पाटील, राष्ट्रवादी काँग्रेस ओबीसी सेलचे प्रा. दिनेश शेलकर, बबलू पाटील यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केलेल्या विविध पक्षातील पदाधिकाऱ्यांचे स्वागत करताना आमदार अनिलदादा पाटील.





अमळनेर : सती माता मंदिर बोगद्यात प्रचंड पाणी साचल्यामुळे संबंधित यंत्रणेने पंप लावून त्या पाण्याचा उपसा सुरू केला आहे. साठलेल्या पाण्यामुळे अनेक गाड्या बोगद्यातच अडकून पडल्या. तर गाड्यांची तारांबळ पाहून एक गाडी यु टर्न मारून परत निघाल्याचे दुसऱ्या छायाचित्रात दिसत आहे. (छायाचित्रे : **रजनीकांत पाटील** )



**अमळनेर : बोरी नदीच्या उगमावर झालेल्या जोरदार पावसामुळे यावर्षी प्रथमच बोरी माई दुथडी भरून वाहत आहे. (छायाचित्र : रवींद्र मोरे)**

# दि अमळनेर को-ऑप. अर्बन बँकेच्या चेअरमनपदी भरतकुमार ललवाणी

## व्हॉईस चेअरमनपदी लक्ष्मण महाजन यांची निवड



अमळनेर : दि अमळनेर अर्बन को-ऑप. बँकेच्या चेअरमनपदी भरतकुमार सुरेश ललवाणी तर व्हॉईस चेअरमनपदी लक्ष्मण पांडुरंग महाजन यांच्या निवडीनंतर त्यांना शुभेच्छा देऊन सत्कार करताना माजी नगराध्यक्षा सौ. जयश्रीताई पाटील व विविध क्षेत्रातील मान्यवर.

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

**अमळनेर** : येथील दि अमळनेर अर्बन को-ऑप. बँकेच्या चेअरमनपदी भरतकुमार सुरेश ललवाणी तर व्हॉईस चेअरमनपदी लक्ष्मण पांडुरंग महाजन यांची २३ सप्टेंबरला बिनविरोध निवड झाली.


पंकज मुंदडे यांनी त्यांच्या चेअरमनपदाचा तर रणजीत शिंदे यांनी त्यांच्या व्हॉईस चेअरमनपदाचा गेल्या दोन महिन्यांपूर्वी राजीनामा दिला होता. त्यामुळे दोन्ही पदे रिक्त झाली होती. सहकार विभागाने नूतन चेअरमन व व्हॉईस चेअरमन यांची निवड करण्यास परवानगी दिल्याने सहाय्यक निबंधक कुणाल सोनार यांच्या अध्यक्षतेखाली सकाळी ११ वाजता बँकेच्या सभागृहात निवडीसाठीची बैठक घेण्यात आली. या बैठकीत चेअरमनपदासाठी भरतकुमार ललवाणी आणि व्हॉईस चेअरमनपदासाठी लक्ष्मण महाजन या दोघांचेच अर्ज दाखल झाल्याने ही निवड बिनविरोध झाली.

यावेळी बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अमृत पाटील,

पान ४ वर

### माळी समाजाला मिळाला प्रथमच बहुमान

लक्ष्मण महाजन यांच्या निमित्ताने माळी समाजाला प्रथमच अर्बन बँकेत संचालकपदाचा व आता व्हॉईस चेअरमनपदाचा बहुमान मिळाला आहे. शहर व तालुक्यात माळी समाज खूप मोठ्या प्रमाणावर आहे. अनेक निवडणुकांमध्ये त्यांचेच मतदान निर्णायक ठरते. मात्र त्यांना मोठ्या राजकीय पदापासून कायम वंचित राहावे लागत होते. आजच्या या निवडीने त्यांची ही खंत निश्चितपणे कमी झाली आहे.



“ अर्बन बँकेच्या संपूर्ण संचालक मंडळाने व सदस्यांनी माझ्यावर टाकलेल्या विश्वासाला मी जराही तडा जाऊ देणार नाही. माझ्या पूज्य पिताश्रीप्रमाणे मीही दमदार, सकारात्मक व विकासात्मक नेतृत्व करेल याचे मी अभिवचन देतो.

**- भरतकुमार सुरेशकुमार ललवाणी, चेअरमन**

## ॥ नवदुर्गेचे आजचे रूप ॥

## चंद्रघंटा

आश्विन शु. १ प्रतिपदा ते आश्विन शु. ९ हा काळ शक्ती पूजनाचा अर्थात शारदीय नवरात्र म्हणून लोकप्रिय सण आहे. या नऊ दिवसांत दुर्गेच्या ९ रूपांची पूजा केली जाते. यात दुर्गेची ९ नामाभिधान आहेत.

या स्वरूपाने डोक्यावर चंद्र व घंटा या आकाराचे शिरस्त्राण धारण केले आहे. एकूण १० हात आहेत. सर्व हातांत शस्त्र धारण केले आहेत. देवीचे रुप अति तेजस्वी असते. या स्वरूपाची उपासना त्रिविध पापांतून मुक्ती देते.



फुल माळा : निळी फुले, गोकर्णी, कृष्णकमळ

नैवेद्य : दूध व दुधाचे पदार्थ

रंग : निळा




अमळनेर : मराठी वाङ्:मय मंडळ, प्रा. आप्पासाहेब र. का. केले सार्वजनिक ग्रंथालय व मोफत वाचनालय यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवारी मराठा मंगल कार्यालयात आयोजित शारदीय व्याख्यानमालेचे दीपप्रज्वलन करून उद्घाटन करताना आमदार अनिलदादा पाटील. शेजारी संगीतकार कौशल इनामदार, मराठी वाङ्:मय मंडळाचे अध्यक्ष डॉ. अविनाश जोशी, श्यामकांत भदाणे, महेश कोठावदे आदी. समोर उपस्थित रसिक श्रोते. ( छायाचित्रे : रवींद्र मोरे )

# किस्से, गाणींसह अनुभवकथनातून रसिक मंत्रमुग्ध

## शारदीय व्याख्यानमालेत संगीतकार कौशल इनामदार यांनी गुंफले पहिले पुष्प

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : एखाद्या कलाकाराच्या अंगी उपजतच कलागुण असतात. त्या कलागुणां मुळे कलाकाराची वेगळी ओळख निर्माण होत असते. अर्थातच हा कलाकार अनेक कलाप्रेमींसाठी आदर्शवत ठरत असतो. जेव्हा हा कलाकार आपल्या आयुष्यातील अनुभव किस्स्यांच्या माध्यमातून सांगत असतो तेव्हा प्रत्येक जण मंत्रमुग्ध होत असतो. असाच काहीसा अनुभव येथे आयोजित शारदीय व्याख्यानमालेत संगीतकार कौशल इमानदार यांच्या व्याख्यानातून रसिकांना आला.

येथील मराठी वाङ्:मय मंडळ, प्रा. आप्पासाहेब र. का. केले सार्वजनिक ग्रंथालय व मोफत वाचनालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित २२ ते २६ सप्टेंबर दरम्यान शारदीय व्याख्यानमालेचे आयोजन मराठा मंगल कार्यालयात करण्यात आले आहे. पहिले पुष्प गुंफत कौशल इमानदार यांनी आपल्या व्याख्यानातून त्यांच्या जीवनप्रवासाचे वर्णन किस्से, गाणी आणि अनुभवातून प्रकट करुन रसिकांना मंत्रमुग्ध केले.

व्याख्यानमालेचे उद्घाटन माजी मंत्री तथा आमदार अनिल पाटील यांनी केले. यावेळी व्यासपीठावर मराठी वाङ्:मय मंडळाचे अध्यक्ष डॉ. अविनाश जोशी, खा. शि. मंडळाचे माजी संचालक हरि भिका वाणी, माजी नगरसेवक विक्रांत पाटील, शामकांत भदाणे, महेश कोठावदे, सामाजिक कार्यकर्त्या स्वप्ना पाटील, महेंद्र महाजन आदी उपस्थित होते.

इनामदार यांनी व्याख्यानाची सुरूवात 'हीच अमुची प्रार्थना अन् हेच अमुचे मागणे, माणसाने माणसाशी माणसासम वागणे...' या गाण्याने करत एकूणच वातावरण भावूक केले. ते पुढे म्हणाले की, भारत हा गोष्टींचा आणि गाण्यांचा देश आहे. कारण महाभारत हे महाकाव्य आहे, असे आम्हाला सुरूवातीपासूनच शिकवले आहे. त्यामुळे प्रत्येकाच्या जीवनात देखील गाण्याला अनन्यसाधारण महत्त्व आहे. 'अयोध्येचा राजा' या चित्रपटातील व्हायोलिन माझ्या आजोबांनी वाजविली होती .त्यामुळे मला संगीताचा वारसा आजोबांकडूनच मिळाला असल्याचेही ते म्हणाले.

संगीतकार, कवी यांना 'हे कुठून येतं..?' हा प्रश्न हमखास विचारला जातो. मात्र कला ही सातत्य ठेवल्यानेच अवगत होते, असे सांगितले .त्यांनी संगीत क्षेत्रातील विविध गमतीजमती सांगून हास्याचे फवारे उडवित श्रोत्यांना मनसोक्त हसविले. उपस्थित दर्दी रसिकांनीही टाळ्यांचा कडकडाटांनी भरभरून दाद दिली.


दरम्यान श्री. इनामदार यांनी 'क्षितीज जसे दिसते तशी म्हणावी गाणी..', 'सुर मागू तुला मी कसा?', 'ओ फिरकी वाली कल तू फिर आना..', 'पंछी बनू उडती फिरु मस्त गगनमे..' आदी गाणे म्हणत रसिकांना आगळ्या- वेगळ्या विश्वात नेले . सूत्रसंचालन प्रा. श्याम पवार व श्रीमती स्नेहलता एकतारे यांनी केले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मंडळाचे उपाध्यक्ष रमेश पवार, कार्यवाह नरेंद्र निकुंभ, कोषाध्यक्ष प्रदीप साळवी, सदस्य शामकांत भदाणे, बन्सीलाल भागवत, कार्यकारी सदस्य संदीप घोरपडे,वसुंधरा लांडगे, ॲड .भैय्यासाहेब मगर, प्रा. डॉ. सुरेश माहेश्वरी, प्रा.सौ.शीला पाटील, अजय केले, स्विकृत सदस्य बजरंगलाल अग्रवाल आणि ग्रंथपाल हेमंत बाळापूरे यांनी सहकार्य केले.



**व्याख्यानाला संगीताची जोड देत पहिले पुष्प गुंफताना संगीतकार कौशल इनामदार यांनी रसिक श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले.**

### संमेलनातून अमळनेरकरांचा मान–सन्मान उंचावला



प्रास्तविकात डॉ. अविनाश जोशी यांनी सांगितले की, मंडळाच्या माध्यमातून गेल्या ७४ वर्षांपासून व्याख्यानमालेचे सातत्यपूर्ण आयोजन केले जात आहे. हा साहित्य क्षेत्राचा मानबिंदू आहे. शिवाय गेल्या वर्षी अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनातून जो मानसन्मान उंचावला आहे तो केवळ मंडळाचा नसून सर्वांचा आहे. याच संमेलनातील ठरावामुळे मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला हे भूषणावह आहे. यासाठी खासदार स्मिताताई वाघ आणि आमदार अनिलदादा पाटील यांचेही योगदान मोठे आहे. पुढील वर्षी मंडळाचे ७५ वे अर्थात अमृत महोत्सवी वर्ष आहे. त्यामुळे हा उत्सव अधिक जोमाने साजरा करावयाचा आहे. मात्र यासाठी सर्वांचे सहकार्य अपेक्षित आहे.

### डॉ.जोशींनी अमळनेरचे नाव सर्वदूर पसरविले



माजी नगरसेवक विक्रांत पाटील म्हणाले की, डॉ. अविनाश जोशी व त्यांच्या मराठी वाङ्मय मंडळाच्या सहकाऱ्यांनी अमळनेरची सांस्कृतिक परंपरा कायम ठेवण्यासाठी केलेल्या प्रयत्नांची पराकाष्ठा कौतुकास्पद आहे.

### 'ए.आय.'चा वापर करून मंडळ आधुनिक करावे



उद्घाटनपर भाषणात आ. अनिलदादा पाटील म्हणाले की, मराठी वाङ्:मय मंडळाचे अध्यक्ष डॉ. अविनाश जोशी व त्यांच्या सहकाऱ्यांनी मंडळाच्या माध्यमातून सांस्कृतिक परंपरा जोपासली आहे . मंडळाच्या प्रयत्नांचे फलित म्हणून गेल्या वर्षाचे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन अमळनेरला झाले. त्यामुळे साहित्य विश्वाच्या इतिहासात अमळनेरचे नाव कोरले गेले. मात्र त्यासाठी शासनाकडून २ कोटी मिळविण्यासाठी मला खूप प्रयत्न करावे लागले. ते मिळण्यासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीही मोठे सहकार्य केले. आज जगाचा कल कृत्रिम बुद्धिमत्तेकडे दिसून येत आहे. त्यादृष्टिने मराठी वाङ्:मय मंडळानेही आधुनिकतेचे पाऊल ओळखून 'एआय'चा वापर करुन आपले मंडळ आधुनिक कसे करता येईल, यावर भर द्यायला हवा.






# कडुलिंब अन् खडीसाखर आरोग्यासाठी अमृत किल्ली

## पंतप्रधान मोदीही करतात मान्य, मग आपण कसे करावे अमान्य...!



काही औषधी वनस्पती इतक्या प्रभावी असतात की त्यांच्या नियमित सेवनाने कित्येक आजार बरे होतात. शरीर निरोगी राहते. रोग प्रतिबंधक शक्ती वाढते. कडुलिंब ही अशीच एक आयुर्वेदिक औषधी वनस्पती आहे. जी त्वचेपासून ते शरीराच्या विविध अवयवांचे आरोग्य जपण्यासाठी बहुपयोगी ठरते. कडुलिंबामध्ये अँटिऑक्सिडंट, अँटीबॅक्टेरिअल आणि इम्युनोमॉड्युलेटरी गुण मिळतात. ते रक्त साफ करते, पचनसंस्था दुरुस्त करते आणि त्वचेचे रंग उजळविते. पण त्याचे सेवन केल्याने पुरळ, डाग आणि खाज सुटणे यासारख्या त्वचेच्या समस्या सुटतात.

कडुलिंबाचे सेवन केल्याने रक्तातील साखर, रक्तदाब आणि यकृताचे आरोग्य सुधारण्यास मदत होते. रोगप्रतिकारक शक्ती वाढविण्यासाठी दीर्घकाळ त्रास देणारे, आजार रोखण्यासाठी आणि शरीर स्वच्छ करण्यासाठी कडुलिंबाच्या पानांचा आणि फुलांचा रस किंवा काढा नियमितपणे सेवन करण्याचा सल्ला आयुर्वेदाने दिला आहे. *कडूलिंबाच्या कोवळ्या पानांचे सेवन केल्याने मोठ्या आतड्याची सफाई होते. हे पान कर्करोगाच्या नियंत्रणासाठीही उपयुक्त असल्याचा काहींचा दावा आहे.*

कडुलिंबासोबत खडीसाखरेचे सेवन केल्याने त्याचे फायदे अनेक पटीने वाढतात. दोन्ही घटक शरीरात थंडावा निर्माण करतात. उष्णतेशी संबंधित समस्या दूर करतात अंतर्गत कमकुवतपणा दूर करतात. शिवाय कडुलिंब हे नावाप्रमाणे कडू असते. त्यामुळे त्यांचे सेवन करणे सहसा कोणाला आवडत नाही. मात्र कडूलिंबासोबत खडीसाखर खाल्याने त्याचा कडूपणा कमी होतो. आणि त्यातील औषधी तत्वही वाढतात. भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आयुर्वेदाचे कट्टर समर्थक आहेत. विश्वसनीय सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार शरीर निरोगी राखण्यासाठी मोदीजी कडुलिंबाची पाने आणि खडीसाखरेचे नियमित सेवन करतात.

### खडीसाखरेचे फायदे

*खडीसाखर चवीला गोड असते हे सर्वांनाच माहीत आहे. खडीसाखरेचे प्रमाणात सेवन केल्याने खोकला कमी होतो. खडीसाखर सर्दी, खोकला, बारीक ताप, आदी प्रतिबंधित करतो सदर आजार प्रतिबंधित करण्यासाठी जी आयुर्वेदिक औषधे वापरली जातात. त्यापैकी अनेक औषधांमध्ये प्रमाणबद्धरित्या खडी साखरेचा वापर केला जातो. खडी साखरेला रोगप्रतिकारक शक्तीवर्धक ही मानले जाते. खासकरून ॲनॅमिक रुग्णांमध्ये अर्थात ज्यांच्या रक्तात हिमोग्लोबिनची पातळी कमी असते ती वाढविण्यासाठीही सीमित प्रमाणात खडीसाखरेचा वापर केला जातो. खडीसाखर अशक्तपणा, कावीळ, चक्कर येणे, थकवा आदी दूर करण्यासाठी उपयुक्त मानली जाते. गुलकंदमध्ये साध्यासाखरेऐवजी खडीसाखर व प्रवाळभस्म योग्य प्रमाणात मिसळल्यास उन्हाळ्यात शरीराची दाहकता कमी करण्यासाठी ते बहुउपयुक्त ठरते. जेवणानंतर बडीशेपबरोबर खडीसाखर खाल्ल्याने पचनक्रिया सुधारते. हे नैसर्गिक माऊथ फ्रेशनर म्हणूनही काम करते.*



### वाहतूक आणि सार्वजनिक व्यवस्था

जपानची सार्वजनिक वाहतूक प्रणाली जगातील सर्वोत्तम प्रणालींपैकी एक आहे. शिंकान्सेन ही बुलेट ट्रेन वेळेच्या अचूकतेसाठी प्रसिद्ध आहे. लोक प्रवास करताना शांतता राखतात सहप्रवाशांना कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही याची काळजी घेतात.

# जपानी साधताहेत पारंपरिक अन् आधुनिकतेचा उत्तम समतोल

**जपानची जीवनशैली ही आधुनिक तंत्रज्ञान, परंपरा, शिस्त आणि उच्चप्रतीच्या सेवांमुळे जगभरात प्रसिद्ध आहे. येथे लोकांच्या दैनंदिन जीवनावर कामाची शिस्त, आरोग्यदायी सवयी आणि संस्कृतीचा मोठा प्रभाव दिसतो.**

### काम आणि शिस्त

जपानी लोक अतिशय मेहनती असतात त्यांच्या कामाच्या ठिकाणी ते वेळेचे काटेकोरपणे पालन करतात. तेथील अनेक कंपन्यांमध्ये पगारी कर्मचारी संस्कृती आहे. तेथील कर्मचारी दीर्घकाळ काम करतात. सतत सुधारणा आणि कामात कौशल्य ही तत्त्वे त्यांच्यासाठी महत्त्वाची असतात. अलीकडे त्यांच्या काम करण्याच्या पद्धती बदलत आहे. जसे की कमी तास काम करणे आणि घरूनच काम करणे.

### आरोग्य आणि आहार

जपानी लोकांचा आहार अतिशय पोषक असतो. दीर्घायुषी राहण्यासाठी ते सुप्रसिद्ध जपानी आहार संस्कृतीचे पालन करतात. त्यामध्ये ताज्या भाज्या, मासे, तांदूळ, सोया उत्पादने आणि हिरव्या चहाचा समावेश असतो. ते कमी प्रमाणात जंक फूड खातात. त्यांच्या अन्नाची गुणवत्ता दर्जेदार असते. तेथील ओकिनावा बेटातील लोक दीर्घायुषी असल्याने त्यांचा आहार जगभर चर्चेत असतो.

### टेक्नॉलॉजी आणि आधुनिक जीवन

जपान हे तंत्रज्ञानाबाबत आघाडीवर आहे. रोबोटिक्स, इलेक्ट्रॉनिक्स आणि ऑटोमेशन यामध्ये त्यांनी खूप प्रगती केली आहे. 'स्मार्ट होमस्,' ए.आय. सहाय्यक आणि उच्च-गुणवत्तेच्या इलेक्ट्रॉनिक वस्तूंचा ते मोठ्या प्रमाणात वापर करतात. त्यांच्या विक्रीतून त्यांना मोठ्या प्रमाणात परकीय चलन मिळते.

### संस्कृती आणि परंपरा

जपानी लोक परंपराप्रिय आहेत. ते अजूनही किमोनो, चहासंस्कार आणि समुराई परंपरा जपत आहेत. त्यांना बागबगीचे व फुलांची आवड आहे. सण उत्सव त्यांना विशेष प्रिय आहे. त्यांच्या फुल शेतीची पारंपारिक कला जगप्रसिद्ध आहे. कामात चिवटपणा आणि प्रामाणिकपणा त्यांना जणू वंशपरंपरेनेच प्राप्त झाला आहे. याबाबीचा त्यांना रास्त अभिमान आहे. त्यामुळेच ते जगभर आदरस्थानी आहेत.





### शिक्षण आणि जीवनशैली

जपानमध्ये शिक्षणाचा स्तर व शैली अत्यंत उच्च आहे. तेथील विद्यार्थी खूप मेहनती असतात. विद्यार्थी दशेत सर्वांना स्वच्छता, नम्रता, शिस्त व अनुशासन याबाबत कोणतीही तडजोड करू दिली जात नाही. विद्यार्थ्यांना लहान वयातच अनेक जबाबदाऱ्यांची जाणीव करून दिली जाते. जपानची जीवनशैली ही पारंपरिक आणि आधुनिकतेचा उत्तम समतोल साधणारी आहे. वेगळेपण देतात.

### घर आणि राहणीमान


जपानी घरे लहान, परंतु अत्यंत नीटनेटकी आणि बहुपयोगी असतात. गादीऐवजी वैशिष्ट्यपूर्ण आणि शरीरासाठी आरामदायी चटई वापरण्याची त्यांची दीर्घकालीन परंपरा आहे.ते कधीही पादत्राणे घालून घरात वावरत नाहीत. प्रत्येकाला पादत्राणे घरा बाहेरच काढून ठेवणे सक्तीचे असते.

### सामाजिक शिष्टाचार

जपानी लोक अतिशय सभ्य आणि नम्र असतात. अभिवादन करताना वाकून नमस्कार करणे ही त्यांची जगप्रसिद्ध संस्कृती आहे. सार्वजनिक ठिकाणी हळू आवाजात बोलणे, लोकांना त्रास होणार नाही याची काळजी घेणे आणि स्वच्छता राखणे यावर त्यांचा विशेष भर असतो.



# पूर्वी सिमेंट ऐवजी उंच इमारती, किल्ले, भव्य मंदिरे बांधताना काय वापरत ?



पूर्वीच्या काळी सिमेंट नसतानाही उंच- उंच इमारती तसेच मोठे किल्ले, भव्य मंदिरे कशी बांधली गेली असतील असा प्रश्न त्या वास्तू पाहिल्यानंतर प्रत्येकाच्या मनात येणे स्वाभाविकच आहे. तुमच्याही मनात सदर प्रश्न डोकावतच असेल. त्याचे उत्तर असे आहे की पूर्वी सिमेंट नसले तरी सिमेंटचाही बाप असलेला खास दर्जाचा घाण्यात तयार करण्यात आलेला (कमावलेला), चुना, लाल दगड, वाळूचा खडक, संगमरवरी आणि इतर नैसर्गिक घटकांपासून बनविलेली एक प्रकारची सिमेंटसारखी पेस्ट वापरली जात असे. जी चुना, बेलगिरीचे पाणी, गूळ,उडीदडाळ, दही, बताशा (साखरेपासून बनविलेले) आणि कातेचू (गोंद) यांसारख्या गोष्टी एकत्र करून त्यावर दीर्घकालीन कक्रया करून बनविली जात असत. त्यामुळे इमारतीं, गड-किल्ले, मंदिरे आदी बांधण्यासाठी जे दगड वापरले जात होते त्यांना कायमस्वरुपी जोडून ठेवण्यासाठी (सिमेंटप्रमाणे) वरील मिश्रणाचा वापर केला जात होता. अर्थात ही पद्धत खूप श्रमाची व परंपरेने मिळालेल्या कलेची होती. मिसळवयाच्या सर्व वस्तू व पदार्थ यांच्या प्रमाणाचे एक विशिष्ट तत्त्व होते. मिसळवयाच्या वस्तूंपैकी कोणतीही एक वस्तू कमी किंवा जास्त झाल्यास मिश्रणाची ताकद कमी होत होती. त्यामुळे तज्ञ व अनुभवी कारांगिरांकडूनच ही कामे केली जात होती.

### संगमरवरी बांधकामे

संगमरवरी बांधकामासाठी राजस्थानमधील मकराना येथील जगप्रसिद्ध अत्यंत शुभ्र, नयनरम्य व पारदर्शक संगमरवरी दगडांचा वापर करण्यात येत असे. विविध आकारांतील संगमरवरी दगड जोडण्यासाठी वैशिष्टपुर्ण पेस्टचा (ज्याचा वर उल्लेख आलेला आहे.) वापर केला जात असे. हल्ली मकराना दगडाच्या नावाखाली अन्य ठिकाणचा कमी दर्जाचा दगड सर्रास विकला जातो. त्यातून ग्राहकांची मोठी लूट होते.

# 'पुल' आणि 'गदिमां'ची 'साहेबां' सोबतची अनोखी सफर...!

हा किस्सा आहे सुमारे ४० वर्षांपूर्वीचा. 'साहेबांनी' बारामतीमध्ये एका साहित्यीक कार्यक्रमाचे आयोजन केले होते. त्यात 'पुल' व 'गदिमा' यांना आमंत्रित केले होते. कार्यक्रम अर्थातच जोरदार झाला. आश्चर्याची गोष्ट म्हणजे साहेबांकडे त्यावेळी स्वतःची गाडी नव्हती. त्यामुळे एका स्थानिक शेठजींची गाडी कार्यक्रमासाठी घेण्यात आली होती. सायंकाळी पुण्याला परतताना शेठजी व साहेब सोबतच होते. इकडच्या-तिकडच्या गप्पा झाल्यावर शेठजींनी सवयीप्रमाणे सरळ मुद्द्यालाच हात घातला.ते म्हणाले, की हे साहित्य वगैरे ठीक आहे. पण तुम्ही लोक पोटापाण्यासाठी काय करता? गाडीमध्ये एक दडपणयुक्त शांतता पसरली. 'गदिमां'च्या कोपिष्ट स्वभावाची साहेबांना पूर्ण कल्पना होती. अपेक्षेप्रमाणेच 'पुलं'नी परिस्थितीचा ताबा घेतला. ते म्हणाले, की आम्ही पोस्टासमोर काम करतो. या अण्णांचे हस्ताक्षर खूप चांगले आहे. त्यामुळे ते लोकांची पत्रे लिहून देतात आणि मी लोकांच्या तुटलेल्या छत्र्या दुरुस्त करून देतो...!






हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. १७, अयोध्यानगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) ४२५००२ येथे छापून गट नं. १६०, प्लॉट नं. ५१/५२, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) ४२५४०१ येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. /२५/A०१९२), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : ७०११००४०४०, ७०११००४२४२, ई-मेल : globalmahatej@gmail.com




पान १ वरून

## पालिका निवडणूक लढवू : आमदार पाटील

हे स्वतः तपासले पाहिजे. नसेल तर उभे राहू नका. मी स्वतः सर्व इच्छुकांच्या मुलाखती घेणार आहे. इच्छा असणाऱ्यांनी स्वतःलाही तपासले पाहिजे. आपले नाव लोकांमधून येऊ द्या. आम्हीही सर्वेक्षण तथा चाचपणी करणार आहोत. गेल्या विधानसभा निवडणुकीत सर्वेक्षणात अर्धा टक्का मत मिळणार नसणारे लोकही आमदारकीसाठी इच्छुक होते. तसे आता व्हायला नको. तुम्हाला तोंडावर सगळे हो सांगतील. पण सर्वांवर विश्वास ठेवू नका. सर्व जाती – धर्मांना सोबत घेण्याची आपली भूमिका असावी. तसेच निवडून आल्यावर बदलू नका. आतातरी बाहेरच्या लोकांनी कितीही दिशाभूल केली तरी बळी पडू नका. आपल्या अमळनेरचा माणूस तीच आपली जात व धर्म आहे. गेल्या काळात राजकीय संघर्ष आपण सर्व मिळून केला आहे. पुढील संघर्ष टाळण्यासाठी तालुका म्हणून एकत्र यावे लागेल. पुढील काळात विकासाचे खूप मोठे व्हीजन आपल्यासमोर आहे. ज्यांनी – ज्यांनी प्रामाणिक काम केले असेल त्यांच्या पाठीशी मी उभा राहणार आहे. अनुभवाची मोठी शिदोरी आपल्यासोबत नसल्याची काळजी नसावी. आपली जनता आणि आपली ताकद हाच आपला विजय आहे.

सदर बैठकीत माजी नगरसेवक मनोज पाटील, विक्रांत पाटील, प्रताप शिंपी, नरेंद्र संदानशिव, सलीम टोपी, निलेश भांडारकर, चेतन राजपूत, राजू फाफोरेकर, बाळा पवार, शितल देशमुख, कैलास पाटील, सोमचंद संदानशिव यासह प्रमुख पदाधिकाऱ्यांनी मनोगत व्यक्त केले.राष्ट्रवादी काँग्रेसचे शहर कार्याध्यक्ष विनोद कदम यांनी सूत्रसंचालन केले.

## अर्बन बँकेच्या चेअरमनपदी भरतकुमार ललवाणी

माजी चेअरमन पंकज मुंदडे, माजी व्हॉ. चेअरमन रणजीत शिंदे, संचालक प्रवीण जैन, प्रदीप अग्रवाल, दीपक साळी, अभिषेक पाटील, प्रवीण पाटील, सौ. वसुंधरा लांडगे, सौ. मनीषा लाठी, पंडित चौधरी, मोहन सातपुते, ॲड. विनायक पाटील, ॲड. विजय बोरसे, तज्ज्ञ संचालक ॲड. व्ही. आर. पाटील, विजय बोरसे, माजी संचालक प्रवीण पाटील (बिपीन बापू), ॲड. ललिता पाटील, प्रा. श्याम पाटील आदी उपस्थित होते.

सदर निवडीनंतर बँकेच्या आवारात आयोजित सत्कार समारंभात राजकीय, सामाजिक, व्यावसायिक, शैक्षणिक, धार्मिक क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी नूतन पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करून आगामी कार्यकालासाठी त्यांना शुभेच्छा दिल्या. दरम्यान, यानंतर लवकरच अर्बन बँकेच्या संचालकांची पंचवार्षिक निवडणूक लागणार आहे. त्या दृष्टिकोनातून श्री. ललवाणी व श्री. महाजन यांच्या निवडीला व तेथील एकूणच राजकीय वर्तुळाला आगळे-वेगळे महत्त्व प्राप्त झाले आहे. बँकेच्या मध्यंतरीच्या काळातील अंतर्गत ताणतणावपूर्ण व आरोप- प्रत्यारोपाने वातावरण ढवळून निघाले होते. नूतन चेअरमन व व्हॉईस चेअरमन निवडीप्रसंगी मात्र सारे काही हसत-खेळत पार पडले. अनेक जुने मित्र व राजकीय स्नेही या निमित्ताने एकत्र आले. सर्वांमध्ये वेगवेगळ्या विषयांवरून जोरदार हास्याच्या लकेरी उडताना दिसल्या. यावेळी माजी नगराध्यक्षा सौ. जयश्री पाटील, मुंदडा बिल्डर्सचे संचालक ओमप्रकाश मुंदडा, खा. शि. मंडळाचे संचालक योगेश मुंदडे, अमळनेर शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव संदीप घोरपडे, माजी नगरसेवक विक्रांत पाटील व राजू फाफोरेकर, प्रा. सुरेश विक्रम पाटील, खा. शि. मंडळाचे अध्यक्ष जितेंद्र झाबक, माजी नगरसेवक ॲड. सुरेश सोनवणे, रघुवंश स्टील सेंटरचे संचालक दत्ता कासार, उद्योजक कल्याण पाटील, प्रा. अशोक पवार, बिल्डर व डेव्हलपर हेमंत पवार, माजी नगरसेवक बाळासाहेब संदानशिव, भाजपचे तालुकाध्यक्ष हिरालाल पाटील, शिवसेनेचे तालुकाप्रमुख सुरेश पाटील, शहरप्रमुख संजय पाटील (भूतबापू), राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष गोविंदा बाविस्कर, महावीर मोबाईल्सचे संचालक अमीत ललवाणी, माजी नगरसेवक श्याम पाटील, नरेश कांबळे, खा. शि. मंडळाचे माजी संचालक जितेंद्र जैन, लाडशाखीय वाणी समाज मंडळाचे अध्यक्ष नितीन भदाणे, माजी नगरसेवक नरेंद्र संदानशिव, प्रा. एस. ओ. माळी, प्रा. श्याम पवार, उदयकुमार खैरनार, प्रीतपालसिंग बग्गा, कमल कोचर, रवींद्रसिंग कालरा, ज्येष्ठ पत्रकार पांडुरंग पाटील, राजपूत एकता मंचाचे संचालक तथा पत्रकार चेतन राजपूत, किरण पाटील, डॉ. विलास साळुंखे, दिनेश नाईक, ॲड. किरण पाटील, माजी उपनगराध्यक्ष लालचंद सैनानी, सुनील वाघ, साखरलाल महाजन, प्रा. दिनेश शेलकर आदी उपस्थित होते.

### भावनिक योगायोग

भरत ललवाणी यांचे दिवंगत पिताश्री सुरेशकुमार, अर्बन बँकेचे दीर्घकालीन संचालक होते. बऱ्याचदा ते प्रथम क्रमांकाने विजयी होत होते. ते बँकेचे चेअरमनही झाले होते. भरतकुमार हेही सतत प्रथम क्रमांकाने विजयी होतात. आता पिताश्रींप्रमाणे तेही चेअरमन झाले आहेत. सुरेश ललवाणी यांच्यामुळे सिंधी समाजातील व्यक्तीला प्रथमच अर्बन बँकेत संचालक तथा चेअरमनपदाचा बहुमान मिळाला होता. ते लोकनियुक्त नगराध्यक्ष, खानदेश शिक्षण मंडळाचे संचालक व स्कूल बोर्डाचेही चेअरमन होते.




## मंगल नवरात्रोत्सव-२०२५



अमळनेर : मंगळग्रह सेवा संस्था संचलित श्री मंगळग्रह मंदिरात दरवर्षी नवरात्रोत्सवानिमित्त शहरातील महिला मंडळांकडून मंगळेश्वरी भूमीमातेची मंगल आरती केली जाते. सोमवारी सायंकाळी पतीदेवांसह मंगल आरती करताना वृक्षवल्ली महिला मंडळाच्या अध्यक्षा नीलिमा राजेश सोनकुसरे, सचिव अपेक्षा दिवाकर पवार व सदस्या प्रिया तुषार रजाळे.



अमळनेर : मंगळग्रह सेवा संस्था संचलित श्री मंगळग्रह मंदिरात दरवर्षी नवरात्रोत्सवानिमित्त शहरातील महिला मंडळांकडून मंगळेश्वरी भूमीमातेची मंगल आरती केली जाते. मंगळवारी सकाळी पतीदेवांसह मंगल आरती करताना तनिष्का महिला मंडळाच्या सदस्या हेमांगी शैलेश काळकर, अनिता राजेंद्र महाले व ज्ञानेश्वरी निलेश पाटील. (छायाचित्रे : नितेश बारी)

# देवीची शक्तिपीठे व इतर स्थाने

देशाच्या सर्व भागांत देवीची पूजा होते. देवीची एकूण १०८ स्थाने सांगितली जातात. देवीची ५१ शक्तिपीठे ही कल्पना तर अत्यंत प्रसिद्ध आहे. महाराष्ट्रातील देवीची ‘औट’ म्हणजे साडेतीन स्थानेही विख्यात आहेत.दक्षाच्या यज्ञात अपमानित झालेल्या सतीने प्राणत्याग केल्यावर शोकग्रस्त शंकर सतीचे शव खांद्यावर घेऊन नृत्य करीत त्रैलोक्यात हिंडू लागला. हे पाहून विष्णूने आपल्या चक्राने सतीच्या शरीराचे तुकडे करून ते देशाच्या वेगवेगळ्या भागांतून टाकले. सतीच्या शरीराचे तुकडे आणि तिचे अलंकार ५१ ठिकाणी पडले. त्यांतील प्रत्येक ठिकाणी एक-एक शक्ती आणि एक-एक भैरव आहेत. त्या-त्या स्थानाला शक्तिपीठ म्हटले जाऊ लागले आहे.

काही प्रमुख शक्तिपीठे पुढीलप्रमाणे

आसाम राज्यात गौहातीजवळ नीलाचल पर्वतावर सतीची योनी गळून पडली. येथील मंदिरात कामाख्या देवीची मूर्ती नसून एका दगडावर योनीची आकृती खोदलेली आहे.

दक्षिण भारतात शिवकांची येथे सतीच्या अस्थींचा सांगाडा गळून पडला. येथील कामाक्षीचे मंदिर प्रसिद्ध आहे.

कन्याकुमारीला सतीच्या देहाचा पृष्ठभाग गळून पडला. भारताच्या दक्षिण टोकाला असलेल्या या स्थानी सागरांचा संगम आहे.

कोलकत्यात सतीच्या उजव्या पायाची बोटे गळून पडली. तेथील कालीघाटावर कालीचे प्रसिद्ध मंदिर आहे.

कोल्हापूर येथे सतीचे तीन नेत्र गळून पडले. तेथील देवीला अंबाबाई म्हणतात. दक्षिण काशी व महाराष्ट्रातील साडेतीन पीठांपैकी अर्धे पीठ या रूपानेही हे क्षेत्र प्रसिद्ध आहे. याशिवाय काशी, वृंदावन, श्रीशैल्यम, पंचवटी, प्रभास, उज्जयिनी, पुष्कर, मानस सरोवर, प्रयाग, जगन्नाथपुरी, अमरकंटक, पशुपतिनाथ आणि कुरुक्षेत्र ही प्रसिद्ध क्षेत्रे शक्तिपीठे म्हणूनही प्रसिद्ध आहेत. महाराष्ट्रात मातापूरची रेणुका , तुळजापूरची भवानी , कोल्हापूरची महालक्ष्मी ही पूर्ण व सप्तशृंगीचे अर्धे पीठ मानले जाते. याबाबत काही ग्रंथात थोडी वेगळी माहिती आहे – महाराष्ट्रात मातापूरची (माहूर) रेणुका, तुळजापुरची भवानी, आंबेजोगाईची योगेश्वरी व कोल्हापूरची महालक्ष्मी (अर्धे पीठ) ही देवीची साडेतीन पीठे मानली जातात. माहूर (जि. नांदेड) येथे परशुरामाची माता रेणुका ही जगदंबेशी एकरूप मानली जाते. येथे मातृतीर्थ आहे. ज्यांना गुजरातेतील मातृगयेला जाणे जमत नाही ते येथे मातृश्राद्ध करतात. तुळजापूर (जि. उस्मानाबाद) येथील भवानी ही शिवाजी महाराजांची व रामदास स्वामींची कुलदेवता होय. आंबेजोगाई (जि. बीड) येथील योगेश्वरीदेवी अनेक घराण्यांची कुलदेवता आहे.



### देवीची इतर काही स्थाने

मदुरा हे दक्षिणेतील महत्त्वाचे तीर्थक्षेत्र. येथे मीनाक्षीचे भव्य मंदिर आहे. येथे शंकराने मीनाक्षीचे पाणिग्रहण केले होते. म्हैसूर येथील चामुंडादेवीचे म्हणजेच महिषासुरमर्दिनीचे मंदिर प्रसिद्ध आहे. गोव्यातील शांतादुर्गा आणि सौंदत्ती (धारवाड) येथील रेणुका म्हणजेच यल्लम्मा यांची क्षेत्रेही प्रसिद्ध आहेत.









अमळनेर : संभाजी भिडे गुरूजी प्रणीत शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान संचलित जय बजरंग मंडळ पानखिडकी यांच्या तर्फे धर्म जागृतीच्या उद्देशाने आयोजित ‘श्री दुर्गा माता दौड’ला मंगळवारी पहाटे पाचला पानखिडकीतील इच्छापूर्ती मंदिरापासून सुरुवात झाली. याप्रसंगी श्री मंगलादेवी माता मंदिर, श्री अष्टभुजा माता मंदिरात आरती करण्यात आली. यावेळी दौड चे ठिकठिकाणी आतषबाजी, पुष्पवृष्टी तसेच रांगोळ्यांनी स्वागत करण्यात आले. शस्त्रधारी सीमा गुरव व पूजा देवरे, ध्वजनिर्माते प्रमोद शिंपी यांच्यासह शहरातील नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. ही दौड मुठे गल्ली, प्रयागीर बुवामढी, श्री मंगलादेवी माता मंदिर, श्री अष्टभुजा माता मंदिर, आनंदपूर बाबा मंदिर या मार्गाने पानखिडकीत परतली.

(छायाचित्रे : नितेश बारी)

# दशमहाविद्येची दहा रूपे सर्व सिद्धी प्रदान करणारी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

दशमहाविद्या म्हणजे देवी पार्वतीची १० रूपे आहेत. जी तांत्रिक उपासनेत पुजली जातात. ही रूपे काली तारा त्रिपुरा सुंदरी (षोडशी), भुवनेश्वरी, त्रिपुर भैरवी, छिन्नमस्ता, धुमावती, बगलामुखी, मातंगी आणि कमलात्मिका अशी आहेत. दहामहाविद्या देवी पार्वतीचीच रूपे मानली जातात. त्या सर्व सिद्धी प्रदान करणाऱ्या आहेत. या दहा महाविद्या विविध दिशांच्या अधिष्ठान शक्ती आहेत. तांत्रिक उपासनेतील साधकांसाठी या महाविद्यांना विशेष महत्त्व आहे.

## अमळनेरमधून ८१ जण हद्दपार

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : गेल्या पाच वर्षांपासून शहर व तालुक्यात जातीय तणाव निर्माण करणारे व दंगल घडविणाऱ्या ८१ जणांवर हद्दपारीची कारवाई करण्यात आली. पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम यांनी याबाबत वरिष्ठांकडे प्रस्ताव दाखल केला होता. त्यानुसार अप्पर पोलीस अधीक्षक कविता नेरकर यांनी संबंधितांना २२ सप्टेंबर ते ३ ऑक्टोबर २०२५ पर्यंत तालुक्यातून हद्दपार केले. गेल्या काही दिवसांपासून शहर व तालुक्यात जातीय तणाव वाढत चालल्याने पोलीस निरीक्षक निकम यांनी गुन्हेगारी प्रवृत्ती आणि जातीय दंगलीत सहभागी अशा ८१ जणांचा नवरात्र व आगामी सण-उत्सव काळात हद्दपारीचा प्रस्ताव डीवायएसपी विनायक कोते यांच्यामार्फत अप्पर पोलीस अधीक्षक नेरकर यांच्याकडे पाठविला होता.

# जगदंबेचा आशीर्वाद मिळविण्यासाठी नवरात्रीच्या पावन दिवसांमध्ये ‘या’ चुका टाळा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

सप्टेंबरपासून शारदीय नवरात्र सोहळा सुरू झालेला आहे. हिंदू धर्मात आश्विन महिन्याच्या शुक्ल पक्षातील प्रतिपदेपासून ते नवमीपर्यंत शारदीय नवरात्र उत्सव साजरा केला जातो. भारतात शारदीय नवरात्रोत्सवाला महत्त्वाचे स्थान आहे. संपूर्ण वर्षभरात एकूण चार नवरात्री असतात. पहिली नवरात्र चैत्र महिन्यात असते. दुसरी शारदीय नवरात्र आश्विन महिन्यात साजरी केली जाते आणि इतर दोन नवरात्री या गुप्त स्वरूपात असतात. परंतु चैत्र आणि आश्विन महिन्यातील शारदीय नवरात्र मोठ्या उत्साहात साजरी केली जाते. नवरात्रीच्या नऊ दिवसांत देवीच्या पूजा-आराधने सह काही नियमांचे पालन करणेही तितकेच महत्त्वाचे आहे.



### नवरात्रीत या चुका टाळाव्यात

घर बंद ठेवू नये : नवरात्रीच्या दिवसांत घरामध्ये घटस्थापना झाली असल्यास घर बंद ठेवू नये. घरामध्ये सतत कोणीतरी असावे.

### केस आणि नखे कापू नये

नवरात्रीच्या काळात महिला व पुरुषांनी केस किंवा नखे कापू नये, असे म्हटले जाते.

### वादविवादापासून दूर राहावे

नवरात्र उत्सवामध्ये मन शांत आणि स्वच्छ ठेवायला हवे. या काळात कोणावरही चिडू नये. घरामध्ये भांडण अथवा कलह निर्माण होईल असे वर्तन नसावे. कारण जिथे भांडण व कलह असतो तेथे लक्ष्मी वास करीत नाही.

### कांदा, लसूण व मांसाहार करू नये

नवरात्र उत्सव काळात कांदा, लसूण आणि मांसाहार करू नये. कारण यामुळे मनामध्ये तामसीक विचार येतात. जे देवीच्या पूजा-आराधनेमध्ये अडथळा निर्माण करू शकतात.

### लहान मुलींवर चिडू नका

हिंदू धर्मामध्ये लहान मुलींना देवीचे रूप मानले जाते. त्यामुळे नवरात्रोत्सव काळात लहान मुलींचे मन दुखवू नये. शिवाय फक्त मुलीच नव्हे तर महिलांचाही आदर करावा.

## डिजिटल पत्राने कृपया अवश्य अभिप्राय द्या

*एकेकाळी पोस्टल पत्रांचा प्रचंड बोलबाला होता. भावभावनांचे, निमंत्रणांचे, सुख- दुःखाच्या वार्तांचे, सर्व प्रकारच्या व्यवहारांची देवाण-घेवाण शक्यतो पोस्टल पत्रानेच होत होती . “ माझ्या मामाचे पत्र हरवले ” असे म्हणत बालपणाचा आनंद आणि सुखद अनुभव आपण सर्वांनीच घेतला आहे. आता मात्र ते मामाचे पत्र जणू कायमचेच हरवले आहे. या पार्श्वभूमीवरही आपण डिजिटल पत्राने अर्थात व्हॉट्सॲपने ग्लोबल महातेज मधील बातम्या व लेख यासंदर्भातील अभिप्राय कृपया अवश्य पाठवा. आमच्यासाठी ते मार्गदर्शक व प्रेरणादायी ठरेल.*

धन्यवाद .

## विनम्र आवाहन

नवरात्रोत्सवानिमित्त आपल्याकडील घट, आरास, पूजा-विधींची वैशिष्ट्यपूर्ण मांडणी त्यांचे फोटो तसेच नवरात्रोत्सवानिमित्त आपल्याकडील काही पारंपारिक, दीर्घकालीन प्रथा, व्रत-वैकल्ये, उपक्रम आदींचीही माहिती आम्हांस या **7711004040** व **7711004242** क्रमांकावर पाठवा.

*संपादक, दै. ग्लोबल महातेज*